# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(शिक्षण विभाग)


जा.क्र..१०८५/शि.वि./२०१६ दि.१०/०६/२०१६

**कृपया त्वरित प्रसिध्दीसाठी**

## माजी राष्ट्रपती मा.श्री.अब्दुल कलाम व माजी पंतप्रधान मा.श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाने कोणतीही शिष्यवृत्ती योजना म.न.पा. नागपूर तर्फे सुरु केलेली नाही

## शिक्षण विभागाचे स्पष्टीकरण

भारताचे माजी राष्ट्रपती मा.श्री.अब्दुल कलाम आझाद व माजी पंतप्रधान मा.श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाने 10 वी व 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरु करण्याबाबत नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागास शासना कडून कोणताही शासन निर्णय अथवा आदेश प्राप्त झालेला नाही. तसेच नागपूर महानगरपालिकेतर्फे शिक्षण विभागानेही विभागस्तरावर भारताचे माजी राष्ट्रपती मा.श्री.अब्दुल कलाम आझाद व माजी पंतप्रधान मा.श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाने 10 वी व 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कोणतीही शिष्यवृत्ती योजना सुरु केलेली नाही.

सोशल मिडीया आणि इतर माध्यमातून प्रसार होत असलेल्या संदेशाच्या पार्श्वभूमीवर सर्व नागरिकांनी आणि संबंधीतांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन महानगरपालिका, शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**